# इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोयीसुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या विशेष तरतुद वितरीत निधी अंतर्गत् इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सोलर हायमास्ट बसविणे हे विकास काम करणेसाठी र.रु. ९,९८,३९,०४९/- (जी.एस.टी. सहीत) अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ क्र. १) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. मनपा २०२३/प्र.क्र. ३२८(५६)/ नवि-१६ दि. २५ जुलै २०२३ चा शासन निर्णय

२) शासन निर्णय नगरविकास विभाग, क्र. धोरण- २०१७ / प्र.क्र. ९६/ नवि-१६ दि. १२ डिसेंबर २०१७, दि. ३० सप्टेंबर २०२० व दि. २४ एप्रिल २०२३

३) वित्त् विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि. १२ एप्रिल २०२३

प्रस्ताव :

महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांना मुलभुत सोयीसुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान देण्यात येत आहे. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आले आहेत. शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद या योजनेअंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका जिल्हा कोल्हापुर यांना सन २०२३-२०२४ करीता र.रु. १० कोटी निधी – इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सोलर हायमास्ट बसविणे या कामाकरीता वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन संदर्भ क्र. १ या अन्वये शासन निर्णय झाला आहे.

१. सदर प्रकल्पअंतर्गतची कार्यान्व्यन यंत्राणा महानगरपालिका राहील.
२. सदर प्रकल्प् खर्चाचा १००% हिस्सा राज्यशासनाचा राहील.
३. सदर प्रकल्प् खर्चाचा १००% हिस्सा राज्य् शासनाचा राहील. त्यामुळे सदर प्रकल्पातंर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प् खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त् झाली असल्याची खातरजमा संबंधित जिल्हाधिकारी यांनी करुन घ्यावी व संदर्भाधिन क्र.३ येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय मान्यता प्रदान करावी इ. कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी महानगरपालका क्षेत्रात विविध ठिकाणी सोलर हायमास्ट बसविणे | ९,९८,३९,०४९/- जी.एस.टी सह |

त्या अनुषंगाने इचलकरंजी क्षेत्रातील विविध ठिकाणांची नियुक्त् सल्लागार पिनाका कन्सल्टंट सांगली यांचेकडून पाहणी करण्यात आली आहे. नियुक्त् सल्लागार यांचेकडुन सद्यस्थितीत असलेली पथदिवे व्यवस्थेची व्याप्ती व गरज लक्षात घेवुन व प्राप्त् निधी च्या अनुषंगाने एकुण ८० ठिकाणी सोलर हायमास्ट स्थापित करणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सोबत स्थ्ळ/ ठिकाणी व मागणीची पत्रे/यादी जोडली आहे. सोलर हायमास्ट बसविणे कामी स्थ्ळ पाहणी निश्चिती करणे व त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल करणेचे संपुर्ण अधिकार मा. आयुक्त् तथा प्रशासक यांचे राहतील.

CamScanner

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६३ (७) अन्वये तसेच कलम २४९ नुसार महानगरपालिकेमध्ये निहीत असलेले सार्वजनिक रस्ते, नगरपालिकेच्या बागा, खुल्या जागा, नगरपालिका बाजार व सार्वजनिक इमारती या ठिकाणी दिवाबत्ती करणे हे महानगरपालिकेचे आवश्य्क व स्वेच्छाधीन कर्तव्य् आहे. सदरप्रमाणे या योजनेतंर्गत इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सोलर हायमास्ट बसविणेत येणार असुन त्याव्दारे सार्वजनिक दिवाबत्तीची व्यवस्था महानगरपालिकेव्दारे करणेत येणार आहे.

उपरोक्त् प्रमाणे प्रस्थावित कामाचे ढोबळ अंदाजपत्रक सन २०२२-२०२३ सार्वजनिक बांधकाम विदयुत विभाग दर सुची मधील दर व Non DSR Item करीता बाजारभावाप्रमाणे मार्केट मधुन दरपत्रक/कोटेशन मागवुन उपायुक्त् यांचे मान्यतेने नियुक्त् सल्लागार यांचेव्दारे दर पृथ्थकरण करुन सर्वात कमीच्या दराप्रमाणे तयार करणेत आलेले असुन अंदाजि रक्कम रु. ९,९८,३९,०४९/- (जी.एस.टी. सहीत) खर्च अपेक्षित आहे. सद्यस्थितीत इचलकरंजी महानगरपालिका येथे मा. आयुक्त् तथा प्रशासक पदावर कार्यरत आहेत.

त्या अनुषंगाने इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या विशेष तरतुद वितरीत निधी अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सोलर हायमास्ट बसविणे कामाच्या प्रस्तावास व ढोबळ अंदाजपत्रकीय र.रु. ९,९८,३९,०४९/- (जी.एस.टी.सहीत) खर्चास मंजुरीचा प्रस्ताव मा. प्रशासक, महोदयांच्या मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यास विनंती आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ४२/ २०२३** दि. २५/१०/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद या योजनेतंर्गत इचलकरंजी महानगरपालिके र.रु. १०,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. दहा कोटी फक्त्) इतका निधी इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सोलर हायमास्ट बसविणे या कामाकरीता मंजुर झाला असुन सदर प्रकल्पांतर्गत इचलकरंजी महानगरपालिका कर्यान्व्यिन यंत्रणा असणार आहे. सदर प्रकल्पाकरीता विदयुत विभागाकडील म.न.पा. पॅनेलवरील नियुक्त् सल्लगार पिनाका कन्सल्टंट सांगली यांचेव्दारे र.रु. . ९,९८,३९,०४९/- (जी.एस.टी.सहीत) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | इचलकरंजी महानगरपिालका क्षेत्रात विविध ठिकाणी सोलर हायमास्ट बसविणे | ९,९८,३९,०४९/- जी.एस.टी सह |

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील मुलभुत सोयीसुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या विशेष तरतुद वितरीत निधी अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी सोलार हायमास्ट बसविणे हे विकास काम करण्यासाठी र.रु. ९,९८,३९,०४९/- (जी.एस.टी.सहीत) अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. तसेच शासन संदर्भ क्र. ३ च्या निर्णयानुसार मा. जिल्हाधिकारी कोल्हापुर यांचेकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवणेस मान्यता देणेत येत आहे. इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रात हायमास्ट बसविणे करीता ठिकाणे निश्चिती, अंतिम करणे व आवश्यकतेप्रमाणे त्यात बदल करणे तसेच या विकासकामाच्या अंमलबजावणीसाठी पुढील आवश्य्क कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना प्रदान करण्यात येत आहेत.

(ओमप्रकाश दिवटे)
**आयुक्त् तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील विंधन विहीरीं खुदाई करणे, सबमर्सिबल पंप सोडणे, पोल पेटी उभारणे, विद्युत कनेक्शन घेणे करीता मा. खासदार यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२३-२०२४ अंतर्गत निधी उपलब्ध होणेकामी ठराव होणेबाबत.

संदर्भ :- १. पत्र वभुवै/भुसविय/कोलां/४३२/२०२३,दि.१८/०९/२०२३ रोजीचे वरीष्ठ भुवैज्ञानिक, भु.स.वि.य यांचे पत्र.

२. जा.क्रं. ३ अ (यां) यांउवि/जिपको/४४०२०२३, दि. १३/१०/२०२३ रोजीचे उपअभियंता (यां) यांचे पत्र.

प्रस्ताव :

विषयांकितकामी संदर्भ क्रं.०१ नुसार इचलकरंजी शहरातील विविध ३६ ठिकाणी विंधन विहिरींचे सर्वेक्षण करून त्यापैकी ३० ठिकाणी विंधन विहिरी करीता खुदाई करणेस योग्य असलेबाबतचा अहवाल देणेत आला आहे. त्यानुसार संदर्भ क्रं. ०२ चे पत्रान्वये सदर ३० ठिकाणावर विंधन विहिर खुदाई करणे व त्याठिकाणी सबमर्सिबल पंप सोडणे कामी प्रत्येकी र.रू. १,०५,८२९/- याप्रमाणे एकूण र.रू. ३१,७४,८७०/- इतक्या रक्कमांचे एकूण ३० अंदाजपत्रके उपअंभियंता (यांत्रिकी) सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सादर केले आहे.

याकामी नव्याने विद्युत कनेक्शन देणे, पोलपेटी उभा करणेकामी आवश्यक असल्याने सदरचा खर्च देखील या योजनेमध्ये ग्राह्य धरून प्रत्येकी र.रू.२०,३७६.५६ /- याप्रमाणे एकूण र.रू. ७,२१,३४०/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी वरीलप्रमाणे विंधन विहीर खुदाई करणे, सबमर्सिबल पंप सोडणे, पोल पेटी उभारणे, विद्युत कनेक्शन घेणे याकरीता एकूण र.रू. ३८,९६,२१०/- इतका खर्च अपेक्षित असुन सदर निधीची मागणी मा. खासदार यांच्या स्थानिक विकास निधी मधून उपलब्ध होणेकामी पूढील कार्यवाही करणेकरिता प्रशासकीय ठराव होणेस, सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रशासकीय मान्यतेस सादर करणेस व प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन निविदा प्रक्रिया राबविणेस आपले मान्यतेस्तव सादर

**प्रशासकीय ठराव क्र. ४३ / २०२३** दि. २७/१०/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील ३० ठिकाणी असणा-या विंधन विहिरी करीता खुदाई करणे, सबमर्सिबल पंप सोडणे, पोल पेटी उभारणे, विद्युत कनेक्शन घेणे याकरीता एकूण र.रू. ३८,९६,२१०/- इतक्या खर्चास मंजुरी देणेत येत असुन सदर र.रू. ३८,९६,२१०/- इतका निधी मा. खासदार श्री. धैर्यशील माने. लोकसभा सदस्य, हातकणंगले मतदार संघ यांचे स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत उपलब्ध होणेबाबत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेत येत असुन सदर प्रशासकीय मान्यता मिळालेनंतर उपरोक्त् कामाची निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

वाचले :- १. इमपा कामगार संघटना कृती समिती यांनी दिले दिनांक २५/१०/२०२३ रोजीचे निवेदन.
२. दिनांक २५/१०/२०२३ रोजीची कृती समिती समवेतची बैठक
३. इकडील जा.क्र.इमपा/आस्था व सा.प्र/०१/३२०/२०२३ चे पत्र
४. शासन वित्त विभागाकडील क्रमांक अग्रिम २०१८/प्र.क्र. २७/१८/ विनियम दि. २३ ऑक्टोबर २०१८ चा निर्णय.
५) दि. २५/१०/२०२३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत
६) दि.२/११/२०२३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत

**प्रस्ताव**

आस्थापना विभागाकडून कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत सादर करणेत आलेला प्रस्ताव अवलोकनी घेतला असता ,उपरोक्त वाचले क्र. १ अन्वये महानगरपालिका कर्मचारी संघटना यांनी निवेदन देवून महानगरपालिका कर्मचारी यांना सन २०२३ चे दिपावली सणाकरीता सानुग्रह अनुदान मिळणे विषयी इकडे मागणी केली होती . वाचले क्र.२ अन्वये विषयांत कामी कृती समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये र.रु.९०००/- सानुग्रह अनुदान देता येईल असे प्रशासनाकडून सूचवण्यात आले होते. व यावर चर्चा करुन आपला योग्य तो निर्णय इकडे तात्काळ कळवावे असे कर्मचारी कृती समितीस सुचविलेले होते.तसेच दिनांक १/११/२०२३ रोजी निर्दशने केली असता चर्चेसाठी बैठक आयोजित केलेचे पत्र देऊन काम बंद आंदोलन करण्यात येऊ नये अशी विनंती केली होती.

प्रकरणी कामगार संघटनांनी आपला दिनांक ०२/११/२०२३ पासुन कामबंद आंदोलन सुरु केले होते. विषयांकित कामी वाचले क्र.३ अन्वये दिनांक ०२/११/२०२३ रोजी सायंकाळी कृती समिती सोबत बैठक आयोजित करणेत आली होती. याबैठकी मध्ये चर्चा होऊन रु १५००० /- पेक्षा जास्त सानुग्रह अनुदान देणे शक्य नसल्याचे निवेदन करुनही कृतीसमिती कामबंद आंदोलन स्थगित करण्यास तयार नसल्याने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागरी सेवा सुरळीत करण्यासाठी सानुग्रह अनुदान रक्कम रु. १७,०००/- अदा करणेबाबत प्रशासनाने सहमती दर्शविलेने त्यावर सर्व संबंधितानी सहमती दर्शवून काम बंद आंदोलन मागे घेण्याची भूमिका घेतली.

**प्रशासकीय ठराव क्रमांक - ४४ /२०२३** **दिनांक - ०७/११/२०२३**

वरील प्रमाणे प्रस्ताव अवलोकनी येऊन खालील अटी शर्तीस अधिन राहुन सानुग्रह र.रुपये १७,०००/- अनुदान अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) दिनांक ०१ एप्रिल २०२२ ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीत इचलकरंजी महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत कर्मचारी, राज्यस्तरीय संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी यांना देय राहील.

५) परिविक्षाधीन कालावधी पुर्ण न झालेल्या मात्र दिनांक ०१ एप्रिल २०२३ पूर्वी किमान एक वर्ष पुर्ण असलेल्या परिविक्षाधीन कर्मचा-यांनाही सदरची रक्कम देय राहील.

६) दिनांक ०१ एप्रिल २०२२ ते या आदेशाच्या दिनांकापर्यंत जो कर्मचारी सलग तीन महिन्याहून अधिक कालावधी गैरहजर/ विना वेतन रजेवर असलेस त्यांना सदर सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

४) चालू आर्थिक वर्षात दिनांक ०१ एप्रिल २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३ कालावधीत सुध्दा सलग तीन महिने अथवा त्यापेक्षा जादा कालावधी संवेत गैरहजर अथवा विना वेतन रजा असलेसही देय होणार नाही. सध्या निलंबित असलेल्या कर्मचा-यांनाही सदर अनुदान देय होणार नाही. दि. ०१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत कर्मचारी निलंवित असल्यास जर त्याचा निलंबित कालावधी सेवा कालावधी गृहित धरला नसेल तर सानुग्रह अनुदान परिगणणेसाठी हा काळ सेवा काळ मानला जाणार नाही.

कृ.मा.पहा

CamScanner

५) दिनांक ०१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत सेवानिवृत्त / स्वेच्छा निवृत्त / मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे सदर सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील.

(अ) सहा महिने ते नऊ महिने इतक्या कालावधीची सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना ५०% या प्रमाणात देय राहील. - (ब) नऊ महिने ते अकरा महिने या कालावधीची सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना ७५% या प्रमाणात देय राहील. (क) अकरा महिन्याहून अधिक सेवा झालेल्या कर्मचा-यांना १००% सानुग्रह अनुदान देय राहील.

६) ज्या कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान अनुज्ञेय असणार नाही, मात्र उपरोक्त वाचलेमध्ये नमुद क्र. २ वरील शासन निर्णयातील अटीस पात्र होणाऱ्या कर्मचा-यापैकी ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, ईद सणानिमित्त तसेच ख्रिसमस करिता सण अग्रीम घेतलेले कर्मचारी वगळून ज्या कर्मचा-यांचा ६ व्या वेतन आयोगानुसार ज्यांचा ग्रेड पे ४८०० चे अनुषंगाने ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनबँड एस-१७- रु.४७६०० - १५११०० पेक्षा जादा नाही अशा कर्मचाऱ्याकडून दोन जामीनदारासह बंधपत्र लिहून घेऊन सण अग्रीम रक्कम रु. १२५००/- अदा करुन ती समान दहा हत्यात वसुली करणेची आहे.

७) प्रकरणी शासन स्तरावरून अथवा शासकीय लेखापरिक्षणात सानुग्रह अनुदान विषयक कोणत्याही प्रकारचा आक्षेप आलेस सदरची रक्कम वसूल करण्यास हरकत नाही असे लाभार्थी कर्मचाऱ्यांकडून विहित नमुन्यात बंधपत्र लिहून घेणेची कार्यवाही करावी .

07/11/2023

(ओमप्रकाश दिवटे )

आयुक्त तथा प्रशासक,

इचलकरंजी महानगरपालिका

CamScanner

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिका हद्दी मधील दैनंदिन बाजार फी, स्टॉल भाडे इ. वसुली मक्ता पध्दतीने देणेबाबत.

प्रस्ताव :

विषयांकित नमुद कामाचा दि. २५/१०/२०२३ इ. रोजी दु. ३.५५ वाजता पात्र निविदा धारकांचा लिफाफा क्र. २ उघडणेत आला. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | प्राप्त् निविदा रक्कम |
|---|---|---|
| १ | पाटील असोसिएटस करीता सुमित महावीर पाटील | १,०५,७०,७२०/- |
| २ | माळी कन्स्ट्रक्शन करीता अमोल माणिक माळी | १,०८,७२,७२९/- |
| ३ | विठठल रामभाऊ जाधव | ९८,२७,२७०/- |

याकामी सर्वात जादा दराची निविदा श्री. माळी कन्स्ट्रक्शन करीता अमोल माणिक माळी यांची र.रु. १,०८,७२,७२९/- प्राप्त् झाली असुन सबब निविदाकार माळी कन्स्ट्रकशन करिता अमोल माणिक माळी यांनी दर्शविलेल्या सर्वात जादा दर रु. १,०८,७२,७२९/- या दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०3 /२०२३ (स्थायी)** **दि. 30 /१०/२०२३**

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिका हद्दी मधील दैनंदिन बाजार फी, स्टॉल भाडे इ. वसुली मक्ता पध्दतीने देणेकामी २०२३-२०२४ सालासाठी रु.९४,००,०००/- इतकी आधारभुत किंमत धरुन २ वर्षासाठी ई – निविदा मागविणेत आली होती. याकामी आलेल्या निविदांमधिल श्री. माळी कन्स्ट्रक्शन करीता अमोल माणिक माळी यांची सर्वात जादा दराची र.रु. १,०८,७२,७२९/- च्या निविदेस २ वर्षाकरीता ( द्वितीय वर्षासाठी - प्रथम वर्षाच्या ई निविदेमध्ये भरलेल्या उच्चतम रक्कमेमध्ये १०% वाढ करुन येणारी रक्कम यानुसार ) निविदा अटी / शर्ती नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त् यांना देणेत येत आहेत.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

# इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : इचलकरंजी महानगरपालिकेकडुन पुरविण्यात येणा-या नविन चेसिसवर अद्यावत फायर फायटर वाहनाची बांधणी करणे (Body Building) अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४३,०७,४७४/-

प्रस्ताव :

जिल्हा वार्षिक सन २०२२-२०२३ अंतर्गत अग्निशमन सेवा व आणीबाणींच्या सेवांचे बळकटीकरण करणेसाठी इचलकरंजी महानगरपालिकेकडुन पुरविण्यात येणा-या नविन चेसिसवर अद्यावत फायर फायटर वाहनाची बांधणी करणे (Body Building) याकामी सदरच्या निविदा मधील तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ दि. ०६/१०/२०२३ इ. रोजी उघडणेत आला. यामधील पात्र निविदा धारकांचा लिफाफा क्र. २ दि. १३/१०/२०२३ इ. रोजी उघडणेत आला असता त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | प्राप्त् निविदा दर % | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ओम गणेश आयर्न वर्क्स | -०.०१३% | L १ |
| २ | त्रिृषिकेश सेफटी कार्गो सर्विसेस | २.०००% | L २ |
| ३ | इंडिया फायरटेक प्रा.लि. | ३.०००% | L ३ |

वरीलप्रमाणे उघडणेत आलेल्या लिफाफा क्र. २ मधील सर्व निविदा धारकांचे निविदेतील दर पाहता ओम गणेश आयर्न वर्क्स यांचा प्राप्त् दर कमीत कमी म्हणजे L १ हा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा – ०.०१३% कमीचा आहे. याबाबत त्यांना निविदा दरामध्ये निगोशिएशन करणे बाबत दि. १३/१०/२०२३ रोजी पत्र दिलेले होते. सदर पत्रास अनुसरुन त्यांनी टेंडरमध्ये दिलेला दर वाजवी व रास्त् असलेने दिलेल्या रक्कमेत काहीही सुट देणे अशक्य् असलेचे दि. १६/१०/२०२३ रोजी ई मेल व्दारे कळविले आहे.

तरी सबब निविदाकार ओम गणेश आयर्न वर्क्स् यांनी दर्शविलेल्या सर्वात कमी शे. -०.०१३% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मान्यता मिळणेकामी इकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०४/२०२३ (स्थायी)** दि. ३० /१०/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येऊन इचलकरंजी महानगरपालिकेकडुन पुरविण्यात येणा-या नविन चेसिसवर अद्यावत फायर फायटर वाहनाची बांधणी करणे (Body Building) अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४३,०७,४७४/- कामाचे निविदाधारक ओम गणेश आयर्न वर्क्स् यांची सर्वात कमीची म्हणजे शे. -०.०१३% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त् यांना देणेत येत आहेत.

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

## इचलकरंजी महानगरपालिका

प्रस्ताव : सणाच्या पार्श्वभुमीवर इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील सर्व अंतर्गत रस्ते व जोड रस्त्यावरील खड्यांना पॅचवर्क करणे. एकुण १५ बाबींचे (Rate Contract) वार्षिक काम (अंदाजपत्रकीय रक्कम रुपये . ६१,००,५४०/-)

प्रस्ताव :

इचलकरंजी महानगरपालिकेकडील बांधकाम विभागाकडुन जाहीर ई दरपत्रक सुचना क्र. ०५/२०२३-२४ निविदेची सुचना दै. सकाळ व दै. तरुण भारत मध्ये दि. १५/०८/२०२३ इ. रोजी प्रसिध्द करणेत आलेली होती. सदरचे निविदा मधील तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. १ दि. ३०/०८/२०२३ रोजी उघडणेत आला तदनंतर पात्र निविदा धारकांचा वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ दि. ०६/०९/२०२३ इ. रोजी उघडणेत आला. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | निविदा र.रु. | प्राप्त् निविदा र.रु. | भरलेला दर टक्केवारी मध्ये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाटणी कन्स्ट्रक्शन | ४९,५२,४९०/- | ४१,८८,४४०/- | शे. १५.४३% कमी दरात | L १ सर्वात कमी |
| २ | गैबान कन्स्ट्रक्शन | ४९,५२,४९०/- | ४४,३३,३८५/- | शे. १०.४८% कमी दरात | |

याकामी सर्वात कमी दराची निविदा मे. पाटणी कन्स्ट्रक्शन यांची शे. १५.४३% कमी दराची प्राप्त् झाली आहे. यापेक्षा कमी दरात काम करणेबाबत इकडील दि. ०७/०९/२०२३ चे निगोशिएशनच्या पत्रान्वये सदर पात्र मक्तेदारास विचारणा केली असता त्यांनी दि. ०७/०९/२०२३ चे पत्र देवुन शे. १५.४३% कमी दरातच काम करणेची तयारी दर्शविली आहे. तसेच निविदेमधील अटी व शर्तीनुसार एस्टीमेट पेक्षा कमी दराची निविदा असल्यास राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड / सार्वजनिक क्षेत्रातील बँकेची बँक हमी / डी.डी. देणेची बाब नमुद असुन त्यानुसार उपरोक्त् L १ यांना दि. ०८/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये बँक गॅरंटी / डी.डी. सादर करणेबाबत पत्र दिले असता L १ यांनी श्री. आदिनाथ को.ऑप. बँक.लि. इचलकरंजी यांचेकडील बँक डी.डी. नंबर १६११९३ र.रु. २,९८,०००/- चा बँक डी.डी. सादर केला आहे.

तरी मक्तेदार मे. पाटणी कन्स्ट्रक्शन यांनी दर्शविलेल्या सर्वात कमी शे. १५.४३% कमी दराच्या निविदेस मंजुरी मिळणेकामी निविदा समितीने शिफारस केली आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०५/२०२३ (स्थायी)** **दि. ८/११/२०२३**

वरील प्रमाणे निविदा समितीची शिफारस अवलोकनी येऊन सणाच्या पार्श्वभुमीवर इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील सर्व अंतर्गत रस्ते व जोड रस्त्यावरील खड्यांना पॅचवर्क करणेकामी एकुण १५ बाबींचे (Rate Contract) (वार्षिक काम ) अंदाजपत्रकीय रक्कम रुपये. ६१,००,५४०/- (जी.एस.टी.सह) कामाचे निविदाधारक पाटणी कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमीची म्हणजे शे. १५.४३% कमी दराच्या निविदेस निविदा अटी / शर्ती नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी पुढील सर्व अनुषंगिक कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त् यांना देणेत येत आहेत.

8/11/2023

( ओमप्रकाश दिवटे )

**आयुक्त तथा प्रशासक**

**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner

प्रस्ताव : पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजरेवाडी जॅकवेल त्याच्या ३३ के.व्हि. सबस्टेशनसह प्रचालन करणे

संदर्भ - १) मा. कैान्सिल सभा क्र. ८९ दि ०६/०८/२०२१ अन्वये प्रशासकिय मान्यता.

२) मे. प्रशासकीय ठराव नं- ६ दि २८/०१/२०२२

३)जा.क्र.पा.पु.२११/२०२२ दि. १३/०५/२०२२ नुसार विषयांकीत कामी निविदाकार यांना देणेत आलेला कार्यारंभ आदेश.

प्रस्ताव :

पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजरेवाडी जॅकवेल त्याच्या ३३ के.व्हि. सबस्टेशनसह प्रचालन करणे कामी इकडील अंदाजपत्रकास मा. कौन्सिलकडे प्रशासकीय मान्यताकामी सादर करणेत आले. सदर अंदाजपत्रकास संदर्भ क्र.१ चे अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करणेत आली.

त्यानुसार विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबवून सर्वात कमीचे दर सादर केलेले निविदाकार यांना संदर्भ क्र. २ प्रशासकीय ठरावाने मिळाले मंजूरी नुसार संदर्भ क्र. ३ चे आदेशान्वये दि. १३/०५/२०२२ रोजी रोजी कार्यारंभ आदेश देणेत आला. सदर कार्यारंभ आदेशामध्ये कामाचा कालावधी ३६५ दिवस इतका नमुद करणेत आला आहे त्यानुसार सदर कामाची मुदत दि. १२/०५/२०२३ रोजी संपुष्टात आली आहे. सदरचे काम दैनंदीन स्वरूपाचे शहराच्या पाणी पुरवठ्याशी निगडीत असलेने आज अखेरपर्यंत चालू ठेवणेत आले आहे. याकामी नव्याने निविदा प्रसिध्द करणेकामी अंदाजपत्रक तयार केले असून सदर अंदाजपत्रक वित्तीय तरतुदीकरीता लेखा व लेखापरिक्षक विभागाकडे सादर केले आहे. उक्त विभागाचा अभिप्राय प्राप्त होताच इकडील विभागामार्फ़त सदरची कामाची निविदा प्रसिध्द करणे ची कार्यवाही करणेत येणार आहे.सदरचे काम दैनंदिन स्वरुपाचे, विनाखंड सुरु ठेवणे आवश्यक असल्याने सदर कामास माहे मे २०२३ पासून ते माहे डिसेंबर २०२३ अखेर अंदाजे र.रु. १२,२६,०१६/- इतका खर्च होणार आहे. सदर कामी खर्च हा पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षमधिल सध्या उपलब्ध असणा-या र.रु. २६,३८,३२६/- या रक्कमेमधून करणेत येणार आहे. सदरचे काम दैनंदीन स्वरूपाचे व विनाखंड सुरु ठेवणे आवश्यक असल्याने या कामी निविदा कामाच्या मुदतीनंतर कार्योत्तर मंजूरी होणे व सदर निविदाकारास दि.३१/१२/२०२३ अखेर निविदाकार यांना देणेत आलेल्या संदर्भिय क्र.३ च्या आदेशान्वये मंजूर दरात मुदतवाढ तसेच नव्याने निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०६ / २०२३ (स्थायी)** दि. ०७ / ११/२०२३

वरील प्रमाणे कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव अवलोकनी येवुन पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजरेवाडी जॅकवेल त्याच्या ३३ के.व्हि. सबस्टेशनसह प्रचालन करणेचे काम दैनंदिन स्वरुपाचे विनाखंड सुरु ठेवणे आवश्यक असलेने सदर कामास संदर्भिय क्र.३ अन्वये दिले मंजुरी दरानुसार माहे मे २०२३ ते माहे डिसेंबर २०२३ अखेरच्या मुदतवाढीस कार्योत्त्र मंजुरी देणेत येत असुन सदर कामास देणेत आले मुदतवाढीमध्ये नव्याने निविदा प्रक्रिया पुर्ण करणेस मंजुरी देणेत येत आहे.

7/11/2023

( ओमप्रकाश दिवटे )
**आयुक्त तथा प्रशासक**
**इचलकरंजी महानगरपालिका**

CamScanner